# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड डी.सी.आर. दिनांक ०७/०६/२०१८**

**“मार्केट मधुन कपडे चोरणारी आंतर राज्य टोळी एलसीबी., नांदेडकडून जेरबंद”**

मा. पोलीस अधीक्षक श्री. चंद्रकिशोर मीणा, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश शिंदे यांनी रमजान महीन्याच्या पार्शभुमिवर जिल्हयातील गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी प्रभावी कारवाई करण्याबाबत दिलेल्या सुचनांचे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, श्री. राजेद्र सहाणे यांनी विविध पथके तपार करुन त्यांना केलेल्या मार्गदर्शनाचे अनुषंगाने दिनांक ०६.०६.२०१८ रोजी रात्री तेलंगाणा राज्यातील निजामाबाद व बोधन येथून तयार कपडयांचे मार्केट मधुन कपडयांची चोरी करुन सदर माल तवेरा वाहन क्रमांक एमएच-०४/ईएस-२३२८ मधून नांदेड मध्ये येत असल्याची माहिती मिळाल्याने सदर वाहनाचा पाठलाग करुन धनेगांव येथील राठौर कॉर्नर येथे २२.४५ वा. अडवून त्यातील चालक व चार स्त्रीयांकडून प्लॉस्टीकच्या गोणीमध्ये महीला, मुली व लहान मुलांचे फ्रॉक वेलवेटचे लॉंग फ्रॉक, डिझायनर लेडीज, जिन्स पॅन्टस, लहान मूलांचे जिन्स पॅन्ट, बर्मूडा, लहान मूलांचे टी शर्टस, लहान मूलांचे ड्रेस असे एकुण ७८,५१९/-रुपयांचे कपडे तसेच गुन्हयात वापरलेली तवेरा गाडी व मोबाईल फोन असे एकुण ४,८४,७१९/-रुपयांचा माल जप्त करण्यात आलेला असून त्याबाबत पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण येथे रितसर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

वरील कार्यवाही सपोनि. श्री. पांडूरंग भारती, पोहेकॉ/२६९७ माधव केंद्रे, पोहेकॉ/१६४२ दिलीप जाधव, पोना/२०९० पांढरे, पोकॉ/३३७ रहेमान, पोकॉ/७२१ शेख जावेद, पोकॉ/३२२४ समीर अहेमद, पोकॉ/१३६० पवार, पोकॉ/१३४९ लामतूरे, मपोकॉ/२७५५ उज्वला डिग्रसे, मपोकॉ/९९६ सविता शिंदे, चालक पोना/११७३ सोनाजी कानगूले यांचे पथकाने पार पाडली आहे.

पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा नांदेड.